महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८० /२०२५ दि. २३/०४/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, मुंब्रा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २३/०४/२०२५ रोजी पुढील ६० दिवसा पर्यत दत्तुवाडी रेतीबंदर येथे रेल्वे विभागाचे उड्डाणपुल मुळ वाहतुकीस असलेल्या नवीन उड्डाण पुल जोडण्यात येणार आहे. तसेच जुना रेल्वे ब्रिज वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतुकीस एक मार्ग असणार असुन मुंब्रा शहरामध्ये ये – जा करण्यास सदर ठिकाणी वाहतुक कोंडी निर्माण होणार आहे. सदर ठिकाणी होणारी वाहतुक कोंडी टाळणे आवश्यक आल्याने रेतीबंदर कडुन मुंब्रा शहरामध्ये येण्यास तसेच मुंब्रा शहरामधुन बाहेर जाण्यास जड–अवजड वाहनांना (२.८ मीटर पेक्षा जास्त उंची असलेल्या वाहनांना) प्रवेश बंद करणे तसेच दत्तुवाडी परीसरत पार्किग करण्यास मनाई करणे आवश्यक असुन सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद वेळ –** १) रेतीबंदर येथुन मुंब्रा शहरामध्ये येणाऱ्या व मुंब्रा शहरातुन दत्तुवाडी मार्गे ठाणे कडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना (२.८ मीटर पेक्षा जास्त उंची असलेल्या वाहनांना ) **रेतीबंदर तसेच मुंब्रा रेल्वे स्टेशन** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) रेतीबंदर कडुन मुंब्रा शहरात येणारी सदर वाहने ही मुंब्रा बायपास – वाय जंक्शन मार्गे मुंब्रा शहरात येतील.

ब) वाय जंक्शन कडुन मुंब्रा शहरातुन ठाणे कडे जाणारी सदर वाहने ही मुंब्रा बायपास – रेतीबंदर मार्गे ठाणे शहराकडे जातील.

क) मुंब्रा शहरातुन मुंब्रा रेल्वे स्टेशन मार्गे ठाणे कडे जाणारी सदर वाहने ही कौसा – वाय जंक्शन – मुंब्रा बायपास – रेतीबंदर मार्गे ठाणे शहराकडे जातील.

**नो पार्कींग –** दत्तुवाडी ते रेतीबंदर कडे जाणारे रोडवर काम चालु असलेल्या ठिकाणी पर्यंत मुख्य रस्त्याचे दोन्ही बाजुस वाहने पार्कींग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना दि. २३/०४/२०२५ रोजी पासुन पुढील ६० दिवस अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाठ )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व पो.निरी. मुंब्रा, डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग ठाणे.